जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 AUG 2024 पुण्यनगरी



# पणदूरकर दाम्पत्याकडून विद्यापीठास साठ लाखांची देणगी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील सेवानिवृत्त भूगोल अधिविभागप्रमुख व ज्येष्ठ कायदा अभ्यासक डॉ. ॲड. राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी त्यांची स्वर्गीय कन्या कै. डॉ. ॲड. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ कमवा व शिका महिला वसतिगृहातील अभ्यासिकेसाठी ३५ लाखांची देणगी गतवर्षी दिली होती. आता त्यांनी या वसतिगृहाच्या विस्तारीकरणासाठी २५ लाख रुपये दिले आहेत.

**मुलींनी नावलौकिक करावे :** येत्या पुण्यतिथीपर्यंत अभ्यासिकेचे उद्घाटन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. 'शिकणाऱ्या नातींसाठी' नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन या शुभदिनी आजी-आजोबांकडून अभ्यासिकेच्या स्वरूपात सप्रेम भेट देत असून, मुलींनी या अभ्यासिकेत शिकून खूप मोठे व्हावे, विद्यापीठाचे नावलौकिक करावे, अशी भावना या दाम्पत्याने व्यक्त केली.

यापूर्वी दिलेल्या देणगीमधून अभ्यासिकेचा तळमजला पूर्ण झाला. त्यावेळी धनादेश देताना पणदूरकर यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना आणखीही देणगी देण्याचे वचन दिले होते. आता विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने पहिला मजला विस्तारीकरण करण्याचे ठरवले असल्याने पणदूरकर पती-पत्नींनी त्यासाठी अधिक २५ लाखांचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. संभाजी शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 AUG 2024 तरुण भारत

# विद्यापीठासह महाविद्यालयांत नॅक मूल्यांकनाची लगबग

## 'ए' किंवा 'ए प्लस' मानांकनासाठी प्रयत्न सुरू : नॅकच्या बदललेल्या नियमानुसार तयारी सुरू

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस' तर बहुतांश महाविद्यालयांनाही ए किंवा ए प्लस मानांकन प्राप्त झाले आहे. दर पाच वर्षांनी केल्या जाणाऱ्या नॅकची पुढची फेज होणार असल्याने नॅक मूल्यांकनाची जोरदार तयारी सुरू आहे. दर्जेदार शिक्षण तर आहेच. परंतु एसएसआरपासून ते आवश्यक सोयीसुविधा देण्यावर विद्यापीठासह महाविद्यालयांनी भर दिला आहे. तसेच कार्यशाळांमधून शिक्षक, कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थ्यांसह पालकांनाही प्रशिक्षण दिले जात आहे. एकूणच विद्यापीठासह महाविद्यालयांमध्ये नॅक मूल्यांकनाची लगबग सुरू आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दर पाच वर्षांनी विद्यापीठासह महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन केले जाते. यामध्ये पाच वर्षातील विषयवार मूल्यमापन, प्राथमिक सोयी-सुविधा अशा पाच प्रकारचे निकषावर आधारीत एसएसआर तयार केला जातो. त्यासाठी प्रत्येक अभ्यासक्रमाच्या विभागप्रमुखांनी आपल्या

### पुढचे मूल्यांकन मिळवण्याचा प्रयत्न

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २८८ महाविद्यालयं आहेत. यातील काही महाविद्यालयांना 'बी, बी प्लस' तर काहींना 'ए आणि ए प्लस' मानांकन मिळाले आहे. आता मिळालेल्या मानांकनापेक्षा पुढचे मानांकन मिळवण्यासाठी महाविद्यालयांचे प्रयत्न सुरू.

अभ्यासक्रमाच्या शिक्षणाचा दर्जा, कॅंपस निवड, निकालाची टक्केवारी, संशोधन, सोयीसुविधा, आदींची एकत्रित माहिती द्यायची असते. सर्व विषयांची एकत्रितपणे संकलित माहिती एसएसआरमध्ये असते. नॅक कमिटीबरोबर कशा प्रकारे संवाद साधायचा, नॅक कमिटीला सामोरे जाताना ड्रेसिंग सेन्स कसा असावा, एसएसआर कसा तयार करावा, यासह अन्य गोष्टींचे प्रशिक्षण शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना दिले जात आहे. विद्यापीठ पातळीवरील प्राध्यापक, उपकुलसचिव, टेक्निकल प्रशिक्षक महाविद्यालये, अधिविभागांना नेमकी



माहिती देत आहे. परिणामी आपल्याला नॅकचे 'ए' किंवा 'ए प्लस' मानांकन कसे मिळेल याकडे महाविद्यालयांनी लक्ष केंद्रीत केले आहे. त्यासाठी विद्यापीठासह महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रयत्न सुरु आहे.

पूर्वीचे सात निकषाचे प्रमाण आता दहा निकष केले जाणार आहे. तसेच ऑफलाईन एसएसआर सादर न करता तो ऑनलाईन सबमिट केला जाणार आहे. नॅक मूल्यांकनात गुण किंवा ग्रेड काढून टाकली असून एखाद्या महाविद्यालयाचा किंवा विद्यापीठाचा एसएसआर अचूक असेल तर स्वीकारला जाईल. किंवा त्रुटी असतील तर स्वीकारला जाणार नाही

### गुणवत्तेत वाढ करण्याचा प्रयत्न

नॅक मूल्यांकनामुळे महाविद्यालय शैक्षणिक दर्जा वाढवते, संशोधन, सांस्कृतिक, क्रीडा आदी उपक्रमांमध्ये सहभाग. एकूणच नॅक मूल्यांकनाचे निकष पूर्ण करण्यासाठी परिपूर्ण तयारी करावी लागते. नॅक मूल्यांकनामुळे सातत्याने गुणवत्ता, संशोधन, खेळ सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. महाविद्यालये दक्ष राहून गुणवत्तेत वाढ करण्याचा प्रयत्न करतात.

-डॉ. व्ही. एम. पाटील,
प्राचार्य, न्यू कॉलेज

यासंदर्भात माहिती नॅक मूल्यांकन समिती कळवणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून बदलेले नियम सप्टेंबर २०२४ पासून लागू होण्याची शक्यता आहे. तसेच बदललेल्या नियमानुसार नॅक मूल्यांकन झाले किंवा नाही ऐवढीच माहिती दिली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 AUG 2024
तरुण भारत

# सर्वांगीण विकासासाठी संशोधन महत्त्वाचे

- शिवाजी विद्यापीठातील डॉ. डी. एच. दगडे यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

अविष्कार स्पर्धेच्या माध्यमातून अनेक संशोधने समोर येत आहेत. या संशोधनाचे व्यवसायात रूपांतर करण्याचा प्रयत्न संशोधकांनी केला पाहिजे. कारण मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधन महत्वाचे आहे, असे मत शिवाजी विद्यापीठातील डॉ. डी. एच. दगडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ आणि न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिन अविष्कार संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील होते.

डॉ. दगडे म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाविषयी जनजागृती होण्याची गरज आहे. संशोधन डॉ. सागर डेळेकर, डॉ. आर. एच. अतिग्रे, डॉ. एस. बी. महाडिक, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. पी. के. पवार, डॉ. पी. एम. माने, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. एस. एम. भोसले यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मनिषा नायकवडी यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. ए. आर. कांबळे यांनी आभार मानले

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2024
पुढारी

# विद्यापीठ संगीत, नाट्यशास्त्र अधिविभागात आजपासून कंटेम्पररी नृत्य कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान कंटेम्पररी नृत्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात होणार आहे. कार्यशाळेसाठी शोवन दास (बांगला देश) मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत बॉडी अवेयरनेस, फिजिकल अँड मेंटल बॉडी, कंटेम्पररी डान्स फ्रेजेस, ब्लॉकिंग, बेसिक बॅलेट डान्स प्रॅक्टिस, क्रिएटिंग मुव्हमेंट, फ्लोअर वर्क, मेडिटेशन इन डान्स इत्यादी विषयांबद्दल मार्गदर्शन मिळणार आहे. कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2024
लोकमत

# विद्यापीठात कॉण्टेंपोररी नृत्य कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात आज, मंगळवारी २१ व २२ ऑगस्टला कॉण्टेंपोररी नृत्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात होणार असून यासाठी 'शोवन दास' (बांगलादेश) हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत बॉडी अवेयरनेस, फिजिकल अँड मेंटल बॉडी , आदी विषयांबद्दल मार्गदर्शन लाभणार असल्याचे संगीत व नाट्य शास्त्र विभागाचे डॉ. विनोद ठाकुरदेसाई यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2024
पुढारी

# 'दूरशिक्षण' केंद्रातील समन्वयक, लेखनिकांच्या कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**




शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने संलग्न ८६ महाविद्यालयांच्या दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांना प्रवेश प्रक्रिया माहिती देण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेमध्ये उपकुसचिव व्ही. बी. शिंदे म्हणाले, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र शिक्षणापासून वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य करीत आहे. संगणक चालक विकास मोहिते यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन केले. सहायक प्रा. डॉ. मुफीद मुजावर यांनी एबीसीआयडी तयार करणे व दुहेरी पदवी अर्ज करण्याबाबतचे प्रात्यक्षिक सादर केले. अभ्यास केंद्राच्या कामकाजाबाबत समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, कक्ष अधिकारी महेश साळोखे, विश्वनाथ वरुटे, राजेंद्र आंदरगिसके, मिलिंद सुरुलकर, अमोल आडगुळे आदी उपस्थित होते. सहायक प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2024
लोकमत

# दूरशिक्षण केंद्रात समन्वयक, लेखनिकांची कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्यावतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८६ महाविद्यालयांच्या दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठी प्रवेश प्रक्रिया माहिती कार्यशाळा दूरशिक्षण केंद्राच्या मुख्यालयात झाली. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

शिंदे म्हणाले की, दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र हे शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य करीत आहे विकास मोहिते यांनी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणेबाबत माहिती दिली.

प्रा. डॉ. मुफिद मुजावर यांनी प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी डॉ. के. बी. पाटील, दिलीप मोहाडीकर, महेश साळोखे, विश्वनाथ वरुटे, राजेंद्र आंदरगिसके, मिलिंद सुरुलकर, सनद आडमुठे उपस्थित होते. डॉ. के. बी. पाटील यांनी स्वागत केले. सहा. प्रा. डॉ.नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

20 AUG 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षण केंद्रात प्रवेशाची संधी

## दूरशिक्षणचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र व कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात प्रवेशाची संधी आहे, असे मत दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र व कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रियेबाबत बेळगाव येथील दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या भाऊराव काकेतकर कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या उद्बोधन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे सचिव विक्रम पाटील होते. खजिनदार प्रकाश मरगाळे, खानापूर तालुका मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष गोपाळ देसाई, सदस्य गोपाळराव पाटील, प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पाटील म्हणाले, नोकरी व व्यवसाय सांभाळून महिला, विद्यार्थी, शेतकरी, उद्योजक, कामगार यांना दूरशिक्षण केंद्राच्या एकूण १२ अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होता येते. प्रवेशासाठी दुहेरी पदवीची सोय असून अभ्यासासाठी दर्जेदार स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले जाते. शिवाय विद्यार्थ्यांना तज्ज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शनाबरोबर शैक्षणिक आणि करियर विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शासकीय व निमशासकीय नोकरदार यांना शिक्षणाची संधी निर्माण झाली आहे. याचा फायदा सीमाभागातील विद्यार्थी व कर्मचारी यांनी घ्यावा.

डॉ. सचिन भोसले यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमाबद्दल व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अर्जाबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. एम. व्ही. शिंदे यांनी यांनी केले. आभार डॉ. एम. एस. पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2024
पुढारी

# सीमा भागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षण केंद्रात प्रवेशाची संधी

## डॉ. कृष्णा पाटील; उद्बोधन कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात प्रवेशाची संधी असल्याचे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रियेबाबत बेळगाव येथील दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या भाऊराव काकतकर कॉलेजमध्ये आयोजित उद्बोधन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे सचिव विक्रम पाटील होते. यावेळी खानापूर तालुका मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष गोपाळ देसाई, सदस्य गोपाळराव पाटील, प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, नोकरी व व्यवसाय सांभाळून महिला, विद्यार्थी, शेतकरी, उद्योजक, कामगार यांना दूर शिक्षण केंद्राच्या एकूण १३ अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होता येते. प्रवेशासाठी दुहेरी पदवीची सोय असून अभ्यासासाठी दर्जेदार स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले जाते.

### शिक्षणाच्या विविध संधीविषयी कार्यशाळा घेण्याचा मानस

मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती समितीच्या माध्यमातून बेळगाव भागातील औद्योगिक क्षेत्रामधील कर्मचाऱ्यांचा व खानापूर भागातील उद्योगधंदे यातील कर्मचाऱ्यांची दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणाच्या विविध संधीविषयी कार्यशाळा घेण्याचा मानस महाराष्ट्र एकीकरण समितीचे खजिनदार प्रकाश मरगळे यांनी व्यक्त केला.

याचा फायदा सीमा भागातील विद्यार्थी व कर्मचारी यांनी घ्यावा. यावेळी सहायक प्रा.डॉ. सचिन भोसले यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रम व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अर्जाबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. एस.एन. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एम. व्ही. शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. एस. पाटील यांनी आभार मानले.

20 AUG 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठ बनेल कौशल्य शिक्षणाचे केंद्र

**साधारण २०३५ ला शिवाजी विद्यापीठाचे स्वरुप एक अत्याधुनिक सोयी-सुविधायुक्त असेल. येथे अनेक कौशल्याधारित छोटे-मोठे अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम उपलब्ध करुन देता येतील. नव्हे याची सुरुवातही झाली आहे.**



- डॉ. व्ही. एन. शिंदे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०चा मसुदा २०१९च्या सप्टेंबरमध्ये प्रसृत करण्यात आला होता. त्यावर आलेल्या सूचनांचा साधकबाधक विचार करून साधारण वर्षभरात या शैक्षणिक धोरणाला अंतिम रूप देऊन ते स्वीकारण्यात आले. कोरोनाचा कहर सुरू असताना हा मसुदा अंतिम झाला. कोरोनाच्या तणावाखाली असणाऱ्या भारतातील बहुतांश शिक्षणक्षेत्रातील घटकांकडे याकडे तसे दुर्लक्ष झाले. त्याची तत्काळ अंमलबजावणी करावी, असे निर्देश होते. मात्र, वस्तुस्थिती ओळखून सरकारी यंत्रणेने याची अंमलबजावणी दोन वर्षे पुढे ढकलली. तसेही तत्काळ लागू केले असते, तर शिक्षणक्षेत्रात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असते. इतका गोंधळ झाला असता की, त्यातून सावरेपर्यंत कदाचित पिढी बरबाद झाली असती.

हे लक्षात घेऊन अंमलबजावणी पुढे ढकलून त्यासाठीची पूर्वतयारी सुरू झाली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मोठे बदल सुचविले आहेत. [illegible]

[illegible]

कोल्हापूर, सातारा आणि सांगली हे शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. संलग्नित २८० महाविद्यालये आहेत. यातून २,५०,००० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. [illegible]

[illegible]

(लेखक, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव आहेत.)